## परीशिष्ट-अ सोबतचे विवरणपत्र -1

## १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ अंतर्गत तारेची जाळीचे शेती कुंपण योजना प्रस्ताव

| | | |
|---|---|---|
| 1 | **योजनेचे नांव** | जिल्हयातील शेतकऱ्यांना शेताचे कुंपनाकरीता तारेची जाळी खरेदीवर ८५ % अनुदान देणे. |
| 2 | **योजनेचे स्वरूप** | गडचिरोली जिल्ह्यातील खरीप / रब्बी पिके, भाजीपाला, किंवा फळझाडाची उत्पादन व क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोकाट व जंगली जनावरापासून त्यांच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीकरीता तारेची जाळी खरेदीवर ८५ % किंवा रूपये ७२२५/- प्रति क्विंटल महत्तम रू. २१६७५/- (३.०० क्विंटल मर्यादेत ) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे. |
| 3 | **योजनेचे लाभार्थी** | योजनेचा लाभ दिव्यांग शेतकरी, विधवा महिला शेतकरी, महिला शेतकरी, वनपटेधारक, अनु. जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर मागास प्रवर्गातील शेतकरी तसेच सर्वसाधारण खुला संवर्गातील अल्प भुधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने समुह स्वरूपात तसेच वैयक्तीकरित्या देय राहील. |
| 4 | **लाभाचे स्वरूप** | गडचिरोली जिल्ह्यातील खरीप / रब्बी पिके, भाजीपाला, किंवा फळझाडाची उत्पादन व क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोकाट व जंगली जनावरापासून त्यांच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीकरीता तारेची जाळी खरेदीवर ८५ % किंवा रूपये ७२२५/- प्रति क्विंटल महत्तम रू. २१६७५/- (३.०० क्विंटल मर्यादेत) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे. |
| 5 | **कार्यान्वयीन यंत्रणा** | कृषि विकास अधिकारी , जिल्हा परीषद गडचिरोली. |
| 6 | **अपेक्षित खर्च** | **खर्चाचे अंदाजपत्रक**<br>**अंदाजे - 1 मिटर** तार जाळी -- 1.86 किलो (गेज- १०-१२ )<br>0.40 **हेक्टर क्षेत्र - परिमीती अंदाजे** 160 **मिटर** -- 298 किलो **म्हणजेच-** 3.00 **क्विंटल**<br>**जिल्हयातील सर्व १२ तालुक्यातील शेतक-यांना तार जाळीचा लाभ देण्यात येईल.** यामुळे २०७ एकर शेतीचे मोकाट व जंगली जनावरापासून संरक्षण होईल.<br>**उदिष्ट लाभार्थी :- ६९ शेतकरी (अंदाजे)**<br>प्रति लाभार्थी :- 3.00 क्विंटल खरेदी करेल.<br>तार जाळी दर प्रति क्विंटल- रू. ८५००/-<br>८५ टक्के अनुदान प्रति क्विंटल- अंदाजे रू. ७२२५ /-<br>लाभार्थी हिस्सा १५ टक्के प्रति क्विंटल - अंदाजे रू. १२७५ /- |

| लाभार्थी संख्या | बाजार किंमत 8500 प्रति क्विंटल प्रमाणे ३ क्वि. जाळीची किंमत (रु.) | ८५ % प्रमाणे अनुदान (रु.) | १५ % शेतकरी हिस्सा (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २५५०० | २१६७५ | १२७५ |
| ६९ | १७,५९,५०० | १४,९५,५७५ | १७,५९,५०० |
| **एकूण प्रकल्प अनुदान रक्कम (रु)** | | **१४,९५,५७५** | |
| प्रकल्पाचा प्रशासकीय व आकस्मिक खर्च | | ४४२५ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **एकूण प्रकल्प रक्कम (रु)** | १५,००,०००/- | |
| | | **एकूण प्रकल्प रक्कम (रु) अक्षरी पंधरा लाख रूपये)** | | |
| 7 | **अपेक्षित फायदे** | 1-जिल्हयातील रब्बी पिकाचे क्षेत्र व भाजीपाला पिकाचे क्षेत्र हमखास वाढण्यास मदत होईल.<br>2- मोकाट व जंगली जनावरापासून शेतक-यांच्या पिकाचे संरक्षण.<br>3- शेतक-यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ. | | |

Khomane

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परीषद गडचिरोली**

**योजनेचे नांव:- १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ अंतर्गत तारेची जाळीचे शेती कुंपण योजना**

**तरतूद :- - रू. १५,००,०००/- ( अक्षरी पंधरा लाख रूपये)**

**योजनेचा उद्देश :-** गडचिरोली जिल्ह्यातील रब्बी पिके, भाजीपाला, किंवा फळझाडाची उत्पादन व क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोकाट व जंगली जनावरापासून त्यांच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीकरीता तारेची जाळी खरेदी करून कुंपणासाठी अनुदान देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**योजना राबविण्याची कार्यपद्धती :-** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन तारेची जाळीवर अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे.

१. सदर प्रकल्प मंजूर झाल्यावर योजनेची प्रचार प्रसिद्धी स्थानिक वृत्तपत्र, शेतकरी सभा, गावात दवंडी इ मार्फत पंचायत समिती स्तरावरील अधिकाऱ्यांनी करावी.

२. योजनेचा लाभ दिव्यांग शेतकरी, विधवा महिला शेतकरी, महिला शेतकरी, वनपटेधारक, अनु. जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग शेतकरी तसेच सर्वसाधारण खुला संवर्गातील अल्प भुधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने समुह स्वरूपात तसेच वैयक्तीकरित्या देय राहील.

३. शेतकऱ्याकडे कमीतकमी 0.40 हेक्टर क्षेत्र शेती असणे आवश्यक राहील.

<u>योजनेच्या अटी व शर्ती</u>

1. **लाभार्थी निवड पंचायत समिती स्तरावर पंचायत समिती स्तरावरील निवड समितीव्दारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य पद्धतीद्वारे करण्यात येईल.** पंचायत समितीचे सहायक गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषि) अंतिम यादी कृषि विकास अधिका-याकडे सादर करतील.
2. योजनेचा लाभ अपंग शेतकरी, विधवा महिला शेतकरी ,महिला शेतकरी, वनपटेधारक , अनु. जाती, अनुसूचित जमाती शेतकऱ्यांना प्राधान्याने समुह स्वरूपात तसेच वैयक्तीकरित्या प्राधान्याने देय राहील.
3. शेतक-यांनी अर्ज, जमीनीचा सातबारा, नमुना 8 अ, जातीचे प्रमाणपत्र तसेच अर्ज, बँक पासबुक झेराक्स व आधार कार्ड देणे बंधनकारक राहील.
4. सदर योजना डिबीटी प्रणाली द्वारे राबविण्यात येईल.
5. इच्छूक शेतक-यास वरील कागदपत्रासह पंचायत समिती स्तरावर कृषि विभागाकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.
6. पंचायत समिती स्तरावर अंतिम निवड यादी तयार करतांना जिल्हा स्तरावरून देण्यात येण-या लक्षांकानुसार अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करावी.
7. अंतिम निवड झालेल्या शेतक-यांना गट विकास अधिकारी पूर्वसंम्मती देतील.
8. पूर्वसंम्मती दिल्यानंतर जाळीचा तार 15 दिवसात खरेदी करणे शेतक-यांस बंधनकारक राहील, 15 दिवसात जाळीचा तार खरेदी न केल्यास त्यांची निवड आपोआप रदद होईल व प्रतिक्षा यादितील शेतक-यांची निवड करून त्यास पूर्वसंम्मती देण्यात येईल, अपवादात्मक परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला १५ दिवसांचे आत खरेदी करणे शक्य नसल्यास तसे लेखी अर्ज शेतकऱ्याने सबंधित पंचायत समितीला करावे व अश्या अर्जास निवड समितीने स्थानिक परिस्थिती नुसार लेखी मुदतवाढ देण्यात यावी.
9. शेतक-याने शेतात स्वत: लाकडी किंवा सिमेंट पोलची व्यवस्था करून तारेची जाळी शेतात स्वखर्चाने लावणे बंधनकारक राहील, तारेची जाळी खरेदी करून प्रत्यक्षात शेताचे कुंपण पूर्ण झाल्यावरच अनुदान अनुज्ञेय राहील.
10. खुल्या बाजारातून शेतक-यांने तारेची जाळी खरेदी केल्यानंतर व तारेची जाळी शेतात लावल्यानंतर जीएसटी चे पक्के देयक पंचायत समितीत सादर करेल, पंचायत समितीचे कृषि अधिकारी किंवा विस्तार अधिकारी (कृषि ) प्रत्यक्ष तपासणी करून नोट कॅम मध्ये फोटो घेतील व तपासणी प्रमाणपत्रासह देयके जिल्हा स्तरावर कृषि विभागास सादर करतील. जिल्हा स्तरावर देयक पारीत करून संबधित शेतक-यांचे बँक खात्यात अनुदान रक्कम वळती करण्यात येईल.

11. अनुदान जीएसटी वगळून तार जाळी खरेदीसाठी देण्यात येईल.
12. सदर योजना संपुर्ण जिल्ह्याकरीता सन २०२५/२६ ह्या वर्षाकरीता राबविण्यात येईल.

उपरोक्त अटीच्या आधारे जाळीचे तार खरेदी केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देय राहील. योजनेवर होणारा खर्च तारेच्या जाळीचे कुंपण योजना अंतर्गत सन २०२५/२६ या वर्षात शेतकऱ्यांना तारेची जाळी खरेदीवर ८५ % अनुदान देणे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल.

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परीषद गडचिरोली**

# तारेच्या जाळीसाठी अर्ज.

प्रति,
मा. गट विकास अधिकारी
पंचायत समिती ..............

अर्ज दिनांक:-

**विषय:- १५ वा वित्त आयोग निधीमधून शेतीकुंपणासाठी तारेच्या जाळीचा लाभ मिळणे बाबत.**

अर्जदार शेतकरी पूर्ण नाव:-

गाव:- .................. तालुका:-......................... मो.क्र.:-

जात वर्गवारी (SC/ST/Other)

जमिनीचे क्षेत्रफळ :- ...........हे..................आर.

तार जाळी मागणी (क्विंटल):-

मा. महोदय,

मी वरीलप्रमाणे शेतकरी असून माझ्या वयक्तिक मालकीची शेतजमीन आहे, सदर शेतीवर पाळीव तसेच जंगली जनावरांपासून पिकांना होणाऱ्या नुकसान टाळण्यासाठी माझ्या शेतीला तारेच्या जाळीच्या कुंपणाची आवश्यकता आहे, तरी माझी निवड करून मला तारेच्या जाळीचा लाभ देण्यात यावा, हि विनंती.

तसेच तारेची जाळी मी पूर्वसंमती मिळाल्याशिवाय खरेदी करणार नाही याची मला जाणीव आहे, आणि सदर योजनेच्या अटी व शर्थींच्या अधीन राहून पूर्वसंमती मिळाल्यावर मी स्वतः तारेची जाळी खरेदी करून शेतात लावणार व त्यासाठी इतर अनुषंगिक खर्च मी स्वतः करण्यास तयार आहे.

**सोबत कागदपत्र:-**

१) सातबारा
२) नमुना आठ - अ
३) आधार कार्ड प्रत
४) बँक पासबुक प्रत.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी